स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड परिक्षेत्रातील सायबर गुन्हे रोखण्यासाठी डिजिटल माध्यमांची भूमिका

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

अंतराविद्याशाखे अंतर्गत जनसंवाद आणि पत्रकारिता विषयाच्या
पीएच. डी. पदवीसाठी सादर केलेला संशोधन पूर्व आराखडा

संशोधक

शुभम साईनाथ नर्तावार

मार्गदर्शक

प्रो. डॉ. दीपक शिंदे

माध्यम शास्त्र संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

संशोधन केंद्र

माध्यमशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

1) प्रास्ताविक

आपला समाज आज झपाट्याने आधुनिक जगाकडे वाटचाल करत आहे. सध्याच्या काळात इंटरनेट आणि मोबाईलच्या नियमित वापरामुळे ग्रामीण भागात आणि शहरांत संवादाचे नवे डिजिटल युग सुरु झाले आहे. आज घरात बसून एखादी व्यक्ती इंटरनेटच्या साहाय्याने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहज संपर्क साधू शकत आहे. इंटरनेटच्या माध्यमातून आपल्याला आज कोणत्याही प्रकारची माहिती सहज मिळू शकत आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेटचा वापर अगदी सहज रित्या केल्या जात आहे.

इंटेरनेटचा वापर जसा वाढत आहे त्याच प्रमाणे सायबर गुन्हे देखील वाढत आहेत. या सायबर गुन्ह्यांच्या वाढीमुळे जगभरातील इंटरनेट वापरकर्त्यांच्या मनात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

इंटरनेट वापरून लोकांची फसवणूक करणे, मानसिक त्रास देणे, एखाद्याची वैयक्तिक गोपनीय माहिती त्यांच्या परवनगी शिवाय सार्वजनिक करणे यासारख्या समस्या सर्वसामान्यांसाठी चिंतेचा विषय झाला आहे.

सायबर क्राइम म्हणजे गुन्हेगारी कृत्य आहे, सायबर क्राइम म्हणजे कोणत्याही व्यक्तीच्या, संस्थेच्या किंवा शासनाच्या माहितीवर हल्ला होय. हा हल्ला शारीरिक नसून तर मानसिक, बौद्धिक पातळीवर होतो. जर गुन्ह्या मध्ये इंटेरनेटचा समावेश नसेल तर अशा गुन्हेगारी कृत्यांना सायबर क्राइम असे म्हणतात येत नाही . परंतु अशी गुन्हेगारी कृत्ये करणारा व्यक्ती माहिती तंत्रज्ञान कायदा 2000 अन्वये शिक्षेस पात्र आहे.

जग गतीने आधुनिकते कडे वाटचाल करत आहे, पण त्यासोबतच सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही वाढत आहे. तंत्रज्ञानाच्या क्षमतेत वाढ झाल्यामुळे लोकांची इंटरनेट वर आधारित जीवनशैली तयार होत आहे. आजच्या जगात, इंटरनेटने मानवतेला संपूर्ण जगाशी जोडले आहे,. सोशल मीडियाद्वारे केवळ संवादच होत नाही, तर लोक ऑनलाइन शॉपिंग, डेटा कलेक्शन, गेमिंग, ऑनलाइन शिक्षण आणि ऑनलाइन नोकऱ्या यासारख्या क्षेत्रात इंटरनेटचा वापर करतात. आजकाल, इंटरनेटचा वापर जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात केला जातो, या तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे गुन्हेगार विषयी सायबर गुन्ह्यांचे स्वरूप देखील बदलले आहे आणि त्याच्याशी संबंधित गुन्हे देखील विकसित झाले आहेत. या प्रगतीमुळे सायबर गुन्ह्यांचे प्रकार आणि स्वरूपही बदलत आहे. सायबर गुन्हेगार आता विविध तंत्रज्ञानाचा वापर करून बेकायदेशीरपणे खाजगी आणि सार्वजनिक माहिती मिळवत आहेत.

याशिवाय आर्थिक गुन्हे, दहशतवाद, ऑनलाइन फसवणूक, डेटा चोरी यांसारख्या गुन्ह्यांमध्येही वाढ होत आहे. सायबर गुन्ह्यांबाबत समाजात जागरुकता वाढवण्याची गरज असून सायबर सुरक्षेसाठी नवनवीन तंत्रांचा वापर केला पाहिजे. सायबर गुन्ह्यांची वाढ आणि वाढता धोका हा केवळ वैयक्तिक स्तरापुरता मर्यादित नाही तर त्याचा परिणाम संसाधने, सरकारी संस्था आणि व्यवसायांवरही होतो.

त्यामुळे आपण सायबर सुरक्षेला महत्त्व दिले पाहिजे आणि सायबर गुन्हे रोखण्यासाठी नवीन यंत्रणा आणि तांत्रिक उपाय विकसित करण्याची गरज आहे. हे केवळ वैयक्तिक सुरक्षेच्या पातळीवरच आपल्याला सुरक्षित ठेवणार नाही, तर संपूर्ण समाजाच्या सुरक्षिततेसाठी आणि अधिकारांमध्येही महत्त्वाची भूमिका बजावेल.

सायबर गुन्ह्यांबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी मास कम्युनिकेशनचा वापर केला जातो. यामध्ये सायबर गुन्ह्यांचे प्रकार, त्यांच्या विरोधात कारवाई करण्याच्या पद्धती आणि सायबर सुरक्षिततेसाठी आवश्यक ती काळजी यासारख्या माहितीचा समावेश असतो.

याच बरोबर सायबर गुन्हे आणि मास कम्युनिकेशन या दोन्ही विषयांमध्ये अतूट संबंध आहे. मास कम्युनिकेशनच्या माध्यमातून सायबर गुन्ह्यांबद्दल जनजागृती करण्यात आणि सायबर सुरक्षिततेसाठी जागरूकता निर्माण करण्यात मदत होते.

मास कम्युनिकेशनच्या माध्यमातून सायबर गुन्ह्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जाऊ शकतात.....

- सायबर गुन्ह्यांबद्दल माहिती देणारे जाहिराती आणि प्रचार साहित्य तयार करणे.
- सायबर सुरक्षिततेसाठी मार्गदर्शन आणि सल्ला देणारे कार्यक्रम आयोजित करणे.
- सायबर गुन्ह्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये कार्यक्रम आयोजित करणे.
- सायबर सुरक्षिततेसाठी जागरूकता निर्माण करण्यासाठी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा वापर करणे.

मास कम्युनिकेशनच्या माध्यमातून सायबर गुन्ह्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी अनेक फायदे आहेत, जसे की, सायबर गुन्ह्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात लोकांपर्यंत पोहोचणे, सायबर सुरक्षिततेसाठी मार्गदर्शन आणि सल्ला देण्यासाठी एक प्रभावी माध्यम म्हणून काम करणे. सायबर गुन्ह्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी एक सामाजिक चळवळ म्हणून काम करणे, या सारखे अनेक फायदे सांगता येतील.

2) विषयाची निवड

डिजिटल माध्यमे आणि सायबर गुन्हे या दोन्हींचा अतूट संबंध आहे. भारतासारख्या देशात, जिथे बहुसंख्य लोकसंख्या ग्रामीण अर्थव्यवस्थेशी निगडीत आहे. टप्या टप्याने ही लोक आधुनिक तंत्रज्ञावर अवलंबून राहत आहेत, यामुळे या विषयावर संशोधन करण्याची आवश्यकता आहे. सायबर गुन्ह्यांचा अभ्यास आणि संशोधन केल्याने अनेक महत्त्वाचे प्रश्न सोडवण्यात आणि सायबर सुरक्षा सुधारण्यास मदत होऊ शकते. सायबर सुरक्षा आणि डिजिटल माध्यम सुरक्षितता आणि वापरकर्त्यांची गोपनीय माहितीचे अधिक संरक्षण करण्यासाठी उपाययोजना केल्या जाऊ शकतात. या अनुषंगाने विषयाची निवड करण्यात आली आहे.

3) सामाजिक संशोधनाची उद्दिष्टे

1. डिजिटल माध्यमांची संकल्पना आणि सायबर गुन्ह्याच्या संकल्पनेचे विश्लेषण करणे.
2. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड परिक्षेत्रातील होणाऱ्या सायबर गुन्ह्यांचे प्रकार आणि पद्धतीचा अभ्यास करणे
3. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड परिक्षेत्रातील होणारे सायबर गुन्ह्यांचे परिणाम तपासणे.
4. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड परिक्षेत्रातील सायबर सुरक्षा उपायांच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन करणे.
5. डिजिटल माध्यमे आणि सायबर गुन्ह्यांच्या संदर्भात आव्हाने तपासणे.

4) संशोधनाची गृहीतके

1) विद्यापीठ परिक्षेत्रात सायबर गुन्ह्यात वाढ झाली आहे.
2) सायबर गुन्हे उकल करण्यात पोलीस अंशतः यशस्वी होतात.
3) नागरिकांच्या सायबर अशिक्षित पणाचा गैर फायदा घेतला जातो.
4) सायबर गुन्ह्या संदर्भात माध्यमांची भूमिका महत्वाची आहे
5) सायबर गुन्हे कमी करण्यासाठी जनजागृतिची गरज आहे.

5) संशोधांची मर्यादा व्याप्ती

प्रस्तुत संशोधन विषय स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिक्षेत्रातील नांदेड, परभणी, लातूर, व हिंगोली या चार जिल्ह्याचा मर्यादित करण्यात आला आहे. इंटरनेटची व्याप्ती मोठी आहे. परंतु चार जिल्हे अभ्यासाठी निवडले आहेत. यात वरील जिल्ह्यात घडणाऱ्या डिजिटल माध्यम आणि सायबर क्राइम गुन्ह्याचा अभ्यास करण्यात येईल.

6) प्रकरणीकरण

प्रस्तुत संशोधना साठी संभाव्य पाच प्रकरणाची विभागणी पुढील प्रमाणे केली आहे.

प्रकरण - १ – सायबर गुन्हे व माध्यमांची भूमिका

१.१ - सायबर क्राइम म्हणजे काय?
१.२ - सायबर गुन्ह्याचा अर्थ आणि व्याख्या
१.३ - सायबर हल्ल्याची पद्धत
१.४ - सायबर गुन्ह्याचे वर्गीकरण
१.५ - सायबर गुन्ह्याचे प्रकार व स्वरूप
याची मांडणी सदरील प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण - २ - संशोधन पद्धती

२.१ - संशोधनाचा अर्थ, व्याप्ती, महत्त्व
२.२ - संशोधनाची गृहितकृत्ये
२.३ - संशोधांनाची उद्दिष्टे
२.४ - संशोधनाचा आराखडा, संशोधन पद्धती
२.५ - संशोधन तथ्य संकलन
याची मांडणी सदरील प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण - ३ - भारतातील वेबचा इतिहास

३.१ - इंटरनेटचा उगम व विकास
३.२ - इंटरनेट वापराच्या मर्यादा
३.३ - इंटेरनेटचे वापरकर्ते
३.४ - इंटरनेट सुविधा पुरविण्याची चढाओढ
याची मांडणी सदरील प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण - ४ - डिजिटल मिडिया ची संकल्पना

४.१ - डिजिटल मीडिया म्हणजे काय ?
४.२ - डिजिटल मिडियाचा पारंपारिक माध्यमांवर होणारा प्रभाव
४.३ - डिजिटल माध्यमांद्वारे उद्भवलेल्या आव्हानांचे विश्लेषण आणि त्यांचे महत्त्व
४.४ - डिजिटल माध्यमांनी सन २०२३ मधील सायबर गुन्ह्यांना दिलेली प्रसिद्धी याची मांडणी सदरील प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण - ५ – निष्कर्ष

या प्रकरणात प्रस्तुत संशोधनात साध्य झालेले निष्कर्ष, सूचना, शिफारशी यांचा समावेश करण्यात येईल.

7) संदर्भ सूची

1) डॉ. दीपक शिकारपूर & अॅड वैशाली भागवत (२०१५). सायबर गुन्हे : २१ व्या शतकातील तंत्रज्ञानाचा धोका. विश्वकर्मा पब्लिकेशन्स.
2) डॉ.संजय तुंगार & सुधीर साबळे (२०२४). सायबर अॅटॅक. राजहंस प्रकाशन.
3) डॉ. दीपक शिकारपूर (२०१५). सायबर युद्ध नीती. विश्वकर्मा पब्लिकेशन्स.
4) हेमंत विलासराव देशमुख (२०२४). सायबर सुरक्षा मार्गदर्शिका. हिंद लॉ हाऊस.
5) प्रदीप आगलावे. सामाजिक संशोधन पद्धती
6) Pathak, A. K. (2000). साइबर अपराध.
7) Sarwan, S. (2021). साइबर अपराध.
8) Rajput, B. (2020). Cyber Economic Crime in India

9) Kumar, K. J. (2020). Mass Communication in India. Jaico Publishing House.

संशोधक
शुभम साईनाथ नर्तावार

मार्गदर्शक
प्रो. डॉ. दीपक शिंदे
माध्यम शास्त्र संकुल
स्वा.रा.ती. म. विद्यापीठ, नांदेड